# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 01/07/2020 (बुधवार)

(सकाळ)

### जबरी चोरीचा प्रयत्न

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावर मौजा पावडदौना रोड मौदा येथे दिनांक 30/06/2020 चे 13.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शोमेश्वर खुशालराव कंडे, रा. धापेवाडा ता सावनेर, ह.मु. रतीराम टेकाम यांचे घरी वडोदा हे भारत पेट्रोलपंप येथे कॅशीयर म्हणुन काम करीत होते. फिर्यादी हे डीझेल व पेट्रोल विक्री चे 7,63,670/–रू. बॅकेत भरण्याकरीता सोबती आकाश मनोहर ठवकर सह मोटरसायकलने जात होते. त्या दरम्यान तोंडावर दुपट्टा बांधलेले 2 अनोळखी आरोपीतांनी मोटरसायकलने पाठीमागुन येवुन, फिर्यादी व सोबतीचे डोळयात मिरची पावडर फेकुन त्यांचे मोटरसायकला लात मारल्याने फिर्यादी व सोबती सिमेंट नालीवर खाली पडले. त्यानंतर आरोपीतांनी फिर्यादी जवळील बॅग हिसकावली असता बॅगचे कसे तुटुन बॅग फिर्यादी कडे राहिल्याने आरोपीतांनी त्यास धारधार वस्तूचा धाक दाखविल्यामुळे, फिर्यादीने त्यांची मोटरसायकल तेथेच सोडुन पैश्याची बॅग घेऊन ते मौदा गावाकडे असलेल्या हनुमान मंदीरा जवळ घावत गेले असता दोन्ही आरोपीतांनी फिर्यादीचे डाव्या हाताला, पायाला व आकाश ठवकर यांच्या डाव्या पायाला, शरीरावर व इतर ठिकाणी मारहाण करून फिर्यादी जवळील डिझेल पेट्रोल विक्री चे 7,63,670/– रूपये असलेली बॅग हिसकावण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 393, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार चांगदेव कुथे 9764007720 हे करीत आहे.

### घरफोडी

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 6 कि.मी अंतरावर पारडसिंगा वार्ड क्र. 5 येथे दिनांक 29/06/2020 चे 14:00 वा. ते दिनांक 30/06/2020 चे 07:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– चंद्रभान गणपत बागडे, वय 52 वर्ष, रा. पारडसिंगा हे त्यांच्या भावाच्या घरी घरगुती कार्यक्रम असल्याने घराला कुलूप लावुन गेले होते. दरम्यान फिर्यादींच्या घराचे दाराचा अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने घरातील बेडरूम मधील दाराचे लॉक तोडुन लोखंडी कपाटामधील सोन्या–चांदीचे दागिने एकुण किमंती 31,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जवाहर चव्हान 9545363121 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 4 कि.मी अंतरावर पानवाडी शिवार येथे दिनांक 30/06/2020 चे 10:00 वा. ते 16:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जिवन हरदेवराम कुमेरीया, वय 56 वर्ष, रा. पानवाडी काटोल हे बाहेर गावी गेले होते. दरम्यान फिर्यादीच्या घराचे दाराचा अज्ञात आरोपीने कुलूप तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने घरातील लोखंडी कपाटामधील सोन्या–चांदीचे दागिने किमंती 1,16,000/–रू. व नगदी 1,400/–रू. असा एकुण कि. 1,17,400/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि वानखेडे 8888110877 हे करीत आहे.

3) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर जानकी नगर काटोल येथे दिनांक 10/06/2020 ते दिनांक 30/06/2020 चे 00:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सागर पुलदास महंत, वय 39 वर्ष, रा. जानकी नगर, काटोल यांचे आजोबाचे नावाचे घर पंचवटी येथे असुन फिर्यादी हे परीवारासह काटोल येथे राहतात व नरखेडला सुद्धा घर असुन ते नरखेडला सुद्धा राहतात. फिर्यादी हे काटोल येथील घरी हजर नसतांना अज्ञात आरोपीने त्यांच्या घराचे दाराचा कुलूप तोडुन घरात प्रवेश केले. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या घराचे बेडरूम मधील लोखंडी कपाटातुन सोन्या–चांदीचे दागिने कि 30,000/–रू. व नगदी 5,000/–रू असा एकुण 35,000/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुरेश लांडे 7769824787 हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. कळमेश्वर :– दिनांक 16/03/2019 पासुन वेळोवेळी तसेच दिनांक 30/06/2020 चे 11.30 वा. दरम्यान 32 वर्षीय फिर्यादी/पीडित हि शेतावर पऱ्हाटी निंदण्याकरीता गेली असता आरोपी नामे– नरेन्द्र भाऊराव नागपूरे, वय 32 वर्ष, रा. पोही, ता. कळमेश्वर हा तिचा पाठलाग करीत शेतावर येवुन पीडितेचा हात पकडुन 'तु माझ्या सोबत कळमेश्वरला चल आपण तेथेच राहु, मला तुझ्यासोबत राहायचे आहे, तुला मी सोडणार नाही.' असे बोलुन आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेच्या हातातील विळा हिसकावुन घेवुन, 'तु जर आली नाही तर मी स्वतःला मारुन घेईल, व तुझे नाव घेईल' अशी धमकी दिली. तसेच पीडिता ही शेतातुन घरी परत जात असतांना आरोपीने रस्त्यावर तिचा हात पकडुन 'तु माझ्यासोबत कळमेश्वरला चल' असे बोलुन पीडितेस ओढताण केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354(ड), 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अशोक सरंभळकर, सावनेर विभाग सावनेर हे करीत आहे.

2) पो.स्टे. वेलतुर :– दिनांक 30/06/2020 चे 10.30 वा. दरम्यान 27 वर्षीय फिर्यादी/पीडित हि बायांसोबत शेतात जात असता पीडितेला रूमाल घ्यायची असल्याने ती चुलत सासरे यांच्या घरी गेली तेव्हा बाकी बाया समोर निघून गेल्या असता पीडिता त्यांचे मागे जात होती. दरम्यान आरोपी नामे– गोलु उर्फ पांडुरंग चौधरी, वय 27 वर्ष, रा. शिकारपुर हा रत्यात मिळाला व म्हणाला की, 'तु माझी पो.स्टे. ला रिपोर्ट देवुन मला फसविले व पीडितेस मारहाण करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने शिवीगाळ करून पीडितेला व तिचे पतीला जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 354, 323, 504, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ कुमरे 9421779857 हे करीत आहे.

3) पो.स्टे. रामटेक :– दिनांक 30/06/2020 चे 16.00 वा. ते 17.00 वा. दरम्यान 26 वर्षीय फिर्यादी/पीडित हि शेतात काम करीत असतांना आरोपी नामे– किरणकुमार विक्रम सुरकार, वय 40 वर्ष, रा. डोंगरी रामटेक हा काहीही कारण नसतांना पीडितेस शिवीगाळ करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेच्या पतीस शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 354, 504, 506 (ब)भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि भुते या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर